# ''महान आदेश:-ख्रिस्ती धर्मातील सुवार्तेचा मूळ गाभा:- एक शोध आणि बोध''

*वळवी विश्वास गोरखनाथ,संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा,इतिहास विभाग,कबचौउमवि,जळगाव.*

## साराश :-

*''एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून तुमच्यात सुवार्तेचे बीज आहे का?*
*"जर आपल्याकडे सुवार्ता सांगण्यासाठी उत्साह नसेल,तर आपल्याला समजलेले सत्यही देव लोप पावू देईल."*

*विल सेंगस्टर* सुवार्ता सेवेस मोठे प्राध्यान्य देतात "पूलपिट देवाचा वचनाचे सिहांसन आहे""सुवार्ता सेवेस पाचारण!... देवाचे वचन शिकविण्याकरिता नेमणूक! त्या थोर महान देवाची घोषणा करणारे!सार्वकालिक सुवार्तेचे साक्षीदार!यापेक्षा उच्च आणि पवित्र दुसरी कोणतीही सेवा होऊ शकेल का?देवाने या श्रेष्ठतम कार्यासाठी त्यांच्या एकुलत्या प्रिय पुत्राला पाठविले,वाट चुकलेल्या माणसांना देवाचा इच्छेची घोषणा करण्याचा महत्वपूर्ण कार्यासमान दुसरे कोणतेही कार्य,या निराशेने व गोंधळाने भारावलेल्या,एवढे महत्वाचे असणे शक्य तरी आहे का? धर्मसुधारकांनी प्रार्थना मंदिरातील पुलपीटला महत्वपूर्ण स्थान दिले,ते काही अचानक चुकीने नव्हे, किंवा ते माणसांचा अहंकारी,पुढे-पुढे करण्याच्या वृत्तीमुळे नव्हे,ते देवाच्या योजनेनुसार व भक्तीनुसार दिले गेले,ते सारासार युक्तिवादातून दिलेले आहे,ते देवाच्या वचनांचे राजासन असे नेमले आहे." "तुमच्यात सुवार्तेचे बीज आहे'' ''सुवार्ता ही ख्रिस्ताची महान आज्ञा आहे.सुवार्ता ही देवाचा शब्द उंचारण्याच्या माध्यम आहे.सुवार्ता ही फिलिप प्रमाणे संपूर्ण नगराला ख्रिस्ताची ओळख करून देणारी आहे.सुवार्ता ही तुमच्या उद्धाराची जननी आह.कारण कोणी तरी ख्रिस्ती मिशनऱ्याने सुवार्तेच्या माध्यमातून तुमच्यात ख्रिस्ताच्या बीजाची सुरुवात केली.ख्रिताचे बीज एक प्रत्येक खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीत असते आणि ते साठ-सत्तर संख्येप्रमाणे बहुगुणीत होत जाते.हे बीज ख्रिताचे राज्य वाढविते.आपण आपले सुवार्तेचे बीज घेऊन जाता आहे का?हडसन टेलरलिहितात "प्रेषितांच्या वारस होण्यात कोणी गर्व करितात पण मी तर शोमरोनी स्त्रीचा वारस होईन,ते अन्न आणण्यासाठी गेले आणि आत्म्याच्या तारणाच्या उत्सुकतेपोटी ती आपली घागर टाकून धावत गेली.आज ख्रिस्ती व्यक्ती म्हणून आपण एखाद्या गावात प्रेषिता सारखे अन्न आणण्यासाठी ज्याल की शोमरोनी प्रमाणे ख्रिस्ताची सुवार्ता सांगण्यासाठी?आज आम्हाला आपली घागर टाकून स्वतःचे संपुर्ण अस्तित्व नाकारून,भौतिकतेचा पेहेरावा त्यागून ख्रिस्ताची सुवार्ता सांगण्यासाठी तयार असले पाहीजे.एक लक्षात ठेवा सुवार्तेच्या बीजाचे अस्तित्व तुमच्यात कोणी पेरले नसते तर एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून तुम्हचे अस्तित्व राहिले नसते.

## प्रस्तावना:-

जो ख्रिस्ती माणूस आपली सर्व बुद्धीमत्ता,क्षमता,गुणवत्ता येशू ख्रिस्ताला समर्पण करण्यास राजी नसतो,त्याला प्रेमसमस्या आहे. जी कॅम्बेल मोर्गन लिहितो "तुम्हची प्रीती परिस्थिती नुसार बदलत असेल तर ती प्रीती नाही,पुष्कळ वर्षांपूर्वी इंग्लंडमध्ये एका शब्बाथ शाळेतील मुलाने त्याचा शिक्षिकेला प्रश्न विचारला:'बंडखोर मुलावर देव प्रीती करतो का?"शिक्षिकेने उत्तर दिले,"मुळीच नाही."असे सांगून नकळत देवाची नालस्ती करण्यात आली!जर देव बंडखोर मुलांवर प्रीती करीत नसेल तर त्याने माझ्यावर प्रीती केली नाही!शेक्सपियर म्हणतो,"बदल पाहून प्रीती बदलत असेल तर ती प्रितीच नाही."ख्रिस्ती व्यक्ती हा नेहेमी देवाचा प्रीतेने भरलेला असतो आणि हीच प्रीती त्याच्यात पवित्र अग्नी प्रज्वलित करते म्हणून 'जो देवाच्या अग्नीने पेटलेला आहे'जो आत्म्याने पेटलेला आहे तो दिनांना सुवार्ता सांगेल,ज्याची हृदये खचली त्यांना धीर देईल, जे बंधनात आहेत त्यांची सुटका करण्यासाठी प्रयत्नशील राहील,जो अग्नीने पेटलेला आहे तो दाखवून देईल देव प्रेम आहे आणि त्याने संपूर्ण जगावर प्रेम केले आणि आपला

एकुलताएक पुत्र या जगाच्या पापक्षालनासाठी दिला.जो देवाच्या अग्नीने पेटलेला आहे तो पिनहास आहे ज्याला पाप सहन होत नाही आणि जो पापाप्रति आवेशी आहे.ज्यांच्याबद्दल देव साक्षी देतो पिनहास मध्ये माझा आत्मा वास करितो.आज तुम्हामध्ये हाच आत्मा आहे म्हणून ल तुम्ही पिनहास सारखे आवेशी आणि देवाच्या साक्षीला प्राप्त केलेले ख्रिस्ती आहात.जे अग्नीने पेटलेले आहे ते सर्व आज मोशेच्या बाजूने आहे,पापाच्या पक्षात असणारा देवाच्या विरोधी आहे आणि त्याच्या नाश निश्चित आहे.आज मी लेवी बरोबर मोशेच्या बाजूने आहे तर याजकपदाच्या सार्वकालिक अधिकार माझ्याकडे आहे(2 पेत्र 2:-9)जो अग्नीने पेटलेला आहे तो ख्रिस्ताच्या अंश आहे ज्याने अलिशाप्रमाणे एलियाह कडून आत्म्याचे दोन अंश प्राप्त केलेले आहे.आणि तो अलीशा प्रमाणे यार्देनाचे दोन भाग करणार,मेलेल्या आत्म्यांना नवीन जागृती देणार,ज्याची मेलेली हाडे देखील जीवनाचे कार्य करणार.जो अग्नीने पेटलेला आहे *जे बेलेट* म्हणतों "आपल्याला सर्वात अधिक गरज असलेली आणी पित्याला ती देण्याची इच्छा असलेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे पवित्र आत्मा.जेव्हा येशु हे बोलत होता तोवर पवित्र आत्मा कोणालाही देण्यात आला नव्हता...आज आपण पवित्र आत्मा द्यावा म्हणून प्रार्थना करू नये कारण जेव्हा आपल्यामध्ये परिवर्तन होते तेव्हा तो आपल्यामध्ये वस्ती करितो.जे आत्म्याने चालतात ते धन्य आहे.कारण ते देवाचे पुत्र म्हणून ओळखले जातील'' देवाने तुम्हाला त्याच्या राज्यासाठी पाचारण केलेले आहे.त्यासाठी पाचारणाची पातळी तुमच्या जीवासाठी कोणती आहे ती प्रत्येक खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीला माहित असायला हवी.जगाचे माझ्यासंबंधी काय विचार आहेत,ते काय बोलतात किंवा करतात,त्यांची मला पर्वा नाही.मी काय करावे व मी काय असावे याची आज्ञा देवाने मला दिलेली मी जाणतो आणि त्याच्याच सामर्थ्याने मी निश्चय करतो व त्याचे इच्छित पूर्ण करतो.परिणाम काहीही होणार असोत मी ख्रिस्ताकरिता ध्येर्याने खंबीर राहतो." (2 तिमुथी:8,12,16) *संत ऑगस्टीन* म्हणतो सुवार्ता देवावरील विश्वासाचे कृत आहे"सुवार्तेमधील जे तुम्हाला आवडते त्यावर जर तुम्ही विश्वास ठेवत असाल,आणि जे आवडत नाही त्याचा नकार करत असाल तर तुम्ही सुवार्तेवर नाही तर स्वतःवर विश्वास ठेवतात."

## *१) एक ख्रिस्ती व्यक्ती नेहेमी आत्मिक युद्धाचे प्रतिनिधित्व करीत असतो:-*

*'' जोपर्यंत तुमच्या आत्म्याची प्रमुख इच्छा येशुवर विश्वास ठेवणे आणि प्रीति करणे होत नाही*; तोपर्यंत स्वस्थ बसू नका."-चार्ल्स स्पर्जन-*

मार्टिन लुथर सांगतो "आपला देव सर्वसामर्थ्यशाली किल्ला आहे,आपण आपल्या शक्तीवर विसंबून काही केले तर आपले प्रयत्न व्यर्थ आहेत,पवित्र शास्त्राशी आज्ञाधारक राहून,निष्ठेने आपण युद्ध केले तर यश प्राप्त होते,मग विजयी स्वरात आपण गातो,"आपला विनाश करण्यासाठी, सैतानी व अधर्मी शक्तींनी भरलेल्या जगात,आपल्याला दहशत दाखविली तरी,आपण भिणार नाही कारण,आपल्याद्वारे त्याचा सत्याचा विजय व्हावा अशी देवाची इच्छा आहे,अंधकाराचा राजपुत्र उग्र दिसला तरी आपण घाबरणार नाही,त्याचा सर्वनाश अटळ आहे म्हणून त्याचा क्रोधाचे भयं आपल्याला ग्रस्त करणार नाही, आपल्या ऐका शब्दाने देखील त्याचे पतन होईल."म्हणून जॉन मॅकआर्थर म्हणतात"आत्मिक युद्धाकरिता,देवाचे वचन व सर्व समयी... प्रार्थना" करणें हीच आपल्यासाठी शस्त्रसामग्री आहे,याशिवाय आपली बुद्धी,आपली क्षमता,आपले कसब आणि आपले चातुर्य कुचकामी आहे."

पण आत्मिक युद्ध लढत असतांना तुमचे नैतिक जीवन कसे आहे.तुमचे आत्मिक हत्यार कोणते आहे.कारण ख्रिस्ताविना असलेली नैतिकता आज भरपूर ख्रिस्ती लोकांची जीवनशैली बनून गेलेली आहे.येशू त्याला म्हणाला, "मी तुम्हांला खचीत सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही.(योहान ३:३) जर तुम्हीं ख्रिस्ताविना नैतिक आणि सरळ लोक असाल तर तुम्हीं हरवलेल्या लोकांसारखे तिरस्कारणीय नाशासाठी सिद्ध केलेले आहात.जर तुम्हीं ख्रिस्ताविना शुद्ध आणि आदरणीय लोक असाल.तर तुम्हीं सर्वात वाईट वेशा जी मध्यरात्री रस्त्यांवर फिरते आणि शेवटी ती नाश पावते त्याचप्रमाणे तुमचा देखील निश्चितच नाश होईल."जर तुम्ही पश्चात्ताप केला नाही तर तुम्हा सर्वांचा त्यांच्यासारखा नाश होईल.(लूक १३:३)

## **२) सुवार्ता ही चिन्हे आणि चमत्कारापेक्षा श्रेष्ठ आहे:-**

"तुम्ही चिन्हे व अद्‌भुते पाहिल्यावाचून विश्वास ठेवणारच नाही.(योहान ४:४८)

चार्ल्स स्पर्जन सुवार्ताचे महत्व विशद करतांना लिहितो ''का, प्रिय वाचका, जर वरील वचनानुसार तुझी स्थिती असेल तर तु चिन्हे आणि चमत्कारासाठी हाव धरतोस काय? सुवार्ता हीच एक स्वतः मध्ये चिन्ह व चमत्कार नाही काय? हा चमत्कारांचा चमत्कार नाही का की, "देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र

दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे." ते ठोस मोलवान वचन, "जो कोणी तान्हेला असेल त्याने यावे आणि ते 'जीवनाचे पाणी फुकट' घ्यावे." आणि ते प्रभावी अभिवचन, "जो माझ्याकडे येतो त्याला मी मुळीच घालवून देणार नाही." हे सर्व, चिन्ह व चमत्कारांपेक्षा उत्तम आहे!!! तुम्ही सत्य तारणाऱ्यावर विश्वास ठेवला पाहिजे. कारण तो स्वतः सत्य आहे. जो खोटे बोलू शकत नाही त्याच्या सत्यतेविषयी तुम्ही पुरावे का मागता? भुतांनी स्वतः त्याला देवाचा पुत्र म्हणून घोषित केले; तरी तू त्याच्यावर अविश्वास दाखवतोस काय?.''

### ३) देवाचे वचन कडूगोड असते:-

गोड वचनापासून सावधान *जॉन मैकआर्थर* "प्रभूच्या सेवेतील विश्वासूपणे कार्य करण्याचे फळ कडूगोड असते"देवाचे वचन फक्त तुम्हाला गोड लागत असेल तर सावधान,कारण देवाचा सत्य वचनाने नेहमी हृदय छेदले जात असते, *पेत्राने* यहुदी लोकांना संदेश दिला आणि त्यांचे हृदय छेदले गेले आणि तीन हजार लोक मंडळीत सामील झाले,ज्या यहुद्यांनी येशूला क्रुसित करण्यासाठी नारे-बाजी केली त्याच यहुद्यांची हृदये छेदली आणि भेदली गेली."योहानाने देवदूताच्या हातातून ते लहानसे पुस्तक घेतले व खाऊन टाकिले,ते माझ्या तोंडात मधासारखे गोड लागले,तरी ते खाल्ल्यावर माझे पोट कडू झाले,जीवनात ज्या ख्रिस्ती व्यक्तीचे वचन तुम्हाला कडू लागत असेल तोच खरा ख्रिस्ती अन्यथा बाकी सर्व मग त्यात पाळक,बिशप, रेव्ह, विश्वासी,कोणतीही मंडळी असो ती ढोंगी आणि दगाबाज आहे,ती त्या स्त्री प्रमाणे आहे जी गोड बोलून व्यभिचारात टाकते.*यिर्मयाने* देवाचे वचन खाऊन टाकिले आणि ती वचने अग्नीच्या रूपात कार्य करू लागली,जर तुम्हचा मुखातून निघणारा संदेश अथवा शब्द अग्नी समान कडूगोड नाही,तर ती फक्त पौल सांगतो त्या प्रमाणे व्यर्थ बडबड आहे.आपण व आपले जीवन येशू ख्रिस्ताचा अधीन आणि कडूगोड वचन पचविण्यासाठी तैयार असते तेव्हा या जगातील कोणीही भूतात्मे व सैतान स्वतःदेखील,आपल्याला इजा करू शकत.पण काही ख्रिस्ती लोकांचा मधुचंद्राचा काळ जास्त टिकत नाही.कारण त्यांना परिश्रम केल्याशिवाय प्रतिफळ हवे आहे.

"माझ्या जीवनात *फुकटच* गोष्टी नाहीत अशा मार्गावर येशू कधी चालला नाही त्याने नेहमी देवासाठी प्रत्येक *तास* व *सक्ती खर्ची* टाकली.''ज्या ख्रिस्ती माणसाच्या सेवेत शुद्ध अंतःकरण नाही,आणि प्रभूची सेवा ही फुकट जीवन जगण्याची सर्वोच कला आहे.अशा ख्रिस्ती लोकांचा मधुचंद्राचा काळ संपला की त्यांचे खोटे शिक्षण आणि पापी पितळ काळानुसार उघळ पडते.''

### ४) ख्रिस्ती विरुद्ध ख्रिस्ती मलयुद्द एक जाळ:-

जॉन मॅकआर्थर च्या भाषेत "आपली आध्यत्मिक स्पर्धा इतर ख्रिस्ती व्यक्तीविरुद्ध नाही,दुसऱ्या विश्वासणाऱ्या ख्रिस्ती मनुष्याला आध्यत्मिक स्पर्धेत हरविणे हा आपला उद्देश अधार्मिक समजावा,आपली स्पर्धा तर, आपल्याच जुन्या शारीरिक स्वभावाबरोबर,जगातील वृत्तीबरोबर,सैतानांबरोबर आणि सैतानाची सेवा व दास्य करणाऱ्याबरोबर असावी, आपले ध्येय"ख्रिस्त येशूमध्ये देवाचे जे वरील पाचारण,त्यासंबंधी पण जिंकण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे धावणे." आज सैतानाचे सर्वात मोठे जाळे ख्रिस्ती विरुद्ध ख्रिस्ती यांचे आध्यत्मिक मलयुद्द छेडणे,म्हणून आज अतिकुशल व महत्वकांक्षी ख्रिस्ती मनुष्य सर्वोत्तम आध्यत्मिका मलयुद्द करून देखील पराजयाचा वाटेवर चालतांना दिसतो,*_

1)जी ख्रिस्ती व्यक्ती अथवा मंडळी दुसऱ्या ख्रिस्ती व्यक्ती अथवा मंडळीला हरविण्याचा कारणाने सेवा करते ती व्यक्ती/मंडळी अधार्मिक आणि देवाचा उद्देशाला नाकारणे होय.

2)मंडळीने हे लक्षात ठेवले पाहिजे की आपले मलयुद्द आपल्याच मंडळीत असलेल्या अधार्मिक कचऱ्यावर आणि शारीरिक स्वभावाबरोबर आहे.दुसऱ्या मंडळींच्या चांगुलपणावर हस्तक्षेप करणे हा उद्देश नाही.

3) सर्व मंडळींना देवाचा एकच महान उद्देश प्रदान केला गेलेला आहे,पण प्रत्येक मंडळी नियमाप्रमाणे मलयुद्द करणारच याची शाश्वती कमी असते म्हणून पाऊल सांगतो "जर कोणी मलयुद्द करितो,तर ते नियमाप्रमाणे केल्यावाचून त्याला मुकुट घालण्यात येत नाही(2तिमुथी 2:5)

4)आज ख्रिस्ती व्यक्ती आणि मंडळीत एवढि स्पर्धा वाढलेली आहे की ती एकमेकाविरुद्दच मलयुद्दाचे नियम तोडून युद्द करते आहे,वचनांचे उत्तर सैतानांप्रमाणे वचनाने देते,आध्यात्मिक स्पर्धेत केव्हा सैतानाचा प्रवेश झाला काही मंडळींना माहीतच पडले नाही.

5) नियमाप्रमाणे जी मंडळी युद्द करेल तिलाच जीवनाचा मुकुट देण्यात येईल,अन्यथा मंडळींचे मलयुद्द व्यर्थ

ठरणार,युद्धात विजय दिसत असेल पण ते पराभव असणार,आध्यत्मिक दृष्टी संसाराचा मोहात पडणार,वचन फक्त ऐकू येणार पण कार्य करणार नाही,आज खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीला मंडळींची स्थिती अशी पाहावयाची नाही.

उपाय एकच आहे तु कुठून पडला आहेस त्यांची आठवण कर व पश्चताप करून आपली पहिली कृत्ये कर(प्रकटी 2:5)पहिली कृत्ये कर फार महत्वाचे शब्द आहे,तो पहिला अनुभव जो पश्चतापाचा होता,ज्या दिवशी देवाचा पवित्र आत्मा तुझ्यावर उतरला,ज्या दिवशी देवाचा वचनाने तु भरून गेलास,ज्या दिवशी तुझा नवीन जन्म झाला,ज्या दिवशी तुला सामर्थ्याचा,प्रितीचा आणि अनुशासनाचा आत्मा दिला गेला,आज प्रत्येक मंडळीने आणि ख्रिस्ती व्यक्तीने दुसऱ्या मंडळींशी आणि ख्रिस्ती व्यक्तींशी प्रतिस्पर्धा थांबवून देवाचा नियमानुसार मलयुद्द करायला शिकायला हवे,आणि फक्त देवाने जी मर्यादेची खून दिलेली आहे फक्त तीचकडे धावणे एवढेच ध्येय ठेवायला हवे,अन्यथा नियम तोडून मलयुद्द करणाऱ्या मंडळीला आणि ख्रिस्ती व्यक्तीला मुकुट मिळणार नाही हे लक्षात ठेवावे.

## ५) शब्द आत्म्याने प्रेरित होतो पाळकांचा शब्दफेकाने नाही:-

ख्रिस्ताची सुवार्ता ही श्ब्द्फेकाने नव्हे तर देवाच्या सामर्थ्याने दिली जाते.जॉन मैकआर्थर म्हणतत "पवित्र शास्त्र हे मानवाच्या,अगदी धार्मिक साधुसंतांच्या देखील बुद्धीमत्तेचे व अंतर्ज्ञानाचे भांडार नव्हें.ते देवाचे सत्य,देवाच्याच शब्दात,त्याचेच वचन आहे,स्रोतकर्त्याने म्हटले"हे परमेश्वरा तुझे वचन स्वर्गात सर्वकाळ स्थिर आहे(स्रोत 119:89),पृथ्वीवरील माणसांना देवाचे वचन,दैवी संकेतानुसार प्रकट होऊन ते स्वर्गात दैवी इच्छेने अधिकृत करण्यात आले आहे म्हणून पेत्र सांगतो"हे प्रथम मनात आणावयाचे की शास्त्रातील कोणत्याही संदेशाचा स्वतःच्या कल्पनेने उलघडा होतं नाही"कारण संदेश मनुष्याच्या इच्छेने कधी झालेला नाही;तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यानी देवापासून तो सांगितलेला आहे."(2पेत्र 1:20-21) खरे पाहता देवाचे स्वर्गीय वचन त्याच्या शब्दांनी प्रकट झालें असून ते तारणाचे सामर्थ्य किंवा ते तारणाचे साधन नसून,ते तारणाचा मध्यस्थ असे आहे."

वचन स्पष्ट सांगते संदेश कधीच मनुष्याच्या इच्छेने प्रगट होतं नाही,पण आज जर मंडळीतील संदेश पाहिला तर ती फक्त पाळकांची शब्दफेक असते,त्याला पवित्र आत्म्याची प्रेरणा अथवा जोड नसते म्हणजे तो संदेश ईश्वरप्रेरित नसून स्वयं प्रेरित असतो *उदाहरणार्थ यहूदा सांगतो त्याप्रमाणे "ते अभक्त आहेत व आपल्या देवाची कृपा पालटून तिला कामातुरपणाचे स्वरूप आणतात"* आज काही मंडळीत देवाच्या कृपेचा इतका गैरफायदा होतं आहे की त्याला कामातुरपणाचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते.असे ख्रिस्ती लोक अभक्त झालें आहे म्हणून येशू सांगतो हे दृष्टीकपटी लोकांनो मी तुम्हाला ओळखत नाही.असा पाळक आणि मंडळीला देवाचे सत्य वचन कसे प्राप्त होईल कारण संदेश दिल्यावर त्या संदेशाची पुष्टी अंमलबजावणी स्वर्गात प्रभू येशू देवासमोर मांडतो आणि देव त्या संदेशाला अंतिम मुहर लावतो,मग आज या जगात हजारो लाखो संदेश रोज दिले जातात पण ते ईश्वर प्रेरित आहे का?ते स्वर्गात मान्य होतात का?का फक्त ती शब्दफेक आहे.आज भरपूर मंडळींना आणि पाळकांना स्वतःचा संदेशाची,वचनाची,प्रार्थनेची,सुवार्तेची,व्यक्तीगत जीवनाची पूर्णचौकशी करण्याची गरज आहे,की या सर्व गोष्टीच्या माघे देवाची प्रेरणा आहे की माझी बुद्धीमत्तेची शब्दफेक आहे,का माझे जीवनच शब्दफेक आहे.

## ६) मी देवाचे पुस्तक आहे; हे मानवा,मला वाच:-

*सि.एच.स्पर्जन* म्हणतो "पवित्र-शास्त्र जीवंत देवाचे लीखाण आहे, त्यातील प्रत्येक वचन सर्वसामर्थ्याच्या बोटाने लिहिलेले आहे; प्रत्येक शब्द जो अक्षयी त्याच्या मुखातून आलेला आहे; प्रत्येक वाक्य पवित्र-आत्म्याच्या अधिकारवाणीने लिहिलेली आहेत. जरी मोशेला त्याची कथा अग्निमय लेखनीने लिहिण्यास नियूक्त केले, तरी त्या लेखणीचे नेतृत्व देवाने केले होते. जरी दाविदाने त्याच्या वीणेला स्पर्श केला, आणि त्याच्या बोटांनी सुंदर स्तोत्रांना छेडले, तरी देवाने त्याचा हात सोनेरी वीणेच्या जीवंत तारांवरून फिरवला. जरी शलमोनाने गीतरत्ने गायली असतील, किंवा उच्च दर्जाच्या ज्ञानाची वचने दिली असतील, तरी देवाने त्याच्या ओठांना निर्देशीत केले आणि उपदेशाला वक्तृत्वपूर्ण केले. जर मी घडघडाट करणाऱ्या नहूमचा पाठलाग केला, जेथे घोडे पाण्यातून धावत होते, किंवा हबक्कूक, ज्याने कूशानाचे डेरे विपत्तीने घेरलेले पाहिले; जर मी मलाखी वाचले, तेथे पृथ्वी भट्टीसारखी तप्त झाली आहे; जर मी योहानाच्या गुळगूळीत पृष्ठाकडे वळलो तर तिथे तो प्रितीविषयी सांगतो, किंवा खडबडीत, धगधगणारे पेत्राची अध्याय, जेथे तो अग्नीविषयी सांगतो - जो देवाच्या शत्रूंना गिळंकृत करेल; जर मी यहूदाच्या पुस्तकाकडे वळलो तर तो देवाच्या शत्रूंवर बहिष्कार टाकतांना पाहतो, सर्वत्र मी देवाला बोलतांना पाहतो; ती देवाची वाणी आहे, मनूष्याची नाही; ती वचने - देवाची वचने आहेत, ती अनंत, अदृश्य, सर्वसमर्थाची वचने आहेत, या भूतलाच्या यहोवाची आहेत. पवित्र-शास्त्र हे देवाचे पवित्र-शास्त्र आहे, आणि जेव्हा मी ते पाहतो तेव्हा मला त्यातून आवाज येतो, 'मी देवाचे पुस्तक आहे; हे मानवा, मला वाच."

## ७) तुम्ही अवजड वधस्तंभ वाहता आहे? की हलका वधस्तंभ:-

*'' आध्यत्मिक बाबतीत आज काही ख्रिस्ती अधिकारी आहे;पण ते ख्रिस्ती आत्मिकदृष्ट्या आंधळे आहे.''*

आचार्य दयाप्रकाशजी लिहितात "येशू अवजड वधस्तंभ घेऊन काल्वरीच्या वाटेने चालला.हा वधस्तंभ त्याचा नव्हता त्याने तो वाहून नेला पण वास्तविक तो पाप्याचा-तुमचा आणि माझा वधस्तंभ होता.साऱ्या मानवजातीचे पाप त्याच्यावर लादण्यात आहे.पृथ्वीच्या प्रभूला अंतसंस्कारासाठी कबरही मिळाली नाही.त्याच्याच एका गुप्त शिष्याने स्वतःची कबर त्याला दिली... येशूचा हा सन्यास हे वैराग्य कोणत्याही परंपरेच्या नियमांच्या अधीन नव्हते."

1) अवजड वधस्तंभ:-

ख्रिस्ती लोकांनी हे लक्षात घेणे अगत्याचे आहे की हा वधस्तंभ अवजड आहे,हलका नाही,देवाचे वचन सांगते त्याचे जु अवजड नाही,पण हे लक्षात घ्या ख्रिस्ताची शारीरिक दशा तुमच्या शारीरिक दशेपेक्षा लाजवणाऱ्या होत्या.म्हणून जी ख्रिस्ती व्यक्ती अथवा मंडळींनी हलका वधस्तंभ घेऊन जात असेल ती देवाचा प्रतिफळापासून स्वतःला मुखेल.

2)त्याने दुसऱ्यासाठी वधस्तंभ वाहिला:-

बघा ख्रिस्ताने पापी लोकांसाठी वधस्तंभ वाहिला स्वतःचा गरजा भागविण्यासाठी नाही आज पाळक आणि मंडळी हक्काने सांगेते आम्ही तुमच्या साठी किंमत मोजतो आहे,सर्वस्व मंडळीला द्या,मंडळींचे म्हणणे एका वेळेस योग्य आहे.पण ती खरंच दुसऱ्यांसाठी वधस्तंभ वाहते आहे का?हे पाहणे महत्वाचे आहे.

3)वधस्तंभ वाहून स्वतः साठी कबर देखील मिळाली नाही:-

"देवाकडून प्रतिफळाची अपेक्षा ठेवणे काही गैर नाही,पण वधस्तंभ वाहणाऱ्यांनी हे लक्षात ठेवायला हवे, *आपण ख्रिस्ताचा वधस्तंभ वाहतो आहे,आपल्या सर्वोच देवाचा ज्याचे डोळे अग्नीने भरलेले आहे,ज्याचा तोंडातून दुधारी तरवार निगते आहे,ज्याने शुभ्र झगा घातलेला आहे,ज्याचा हातात साठी तारे आहे,ज्याने सामर्थ्याचा पट्टा घातलेला आहे,ज्याचा पायात सोनपिटाळाचे मोजे घातलेले आहे,जो मेघातून त्याचा खऱ्या ख्रिस्ती मांडीला वधूला घ्यायला येणार आहे अशा महान राजाधिराज ख्रिस्ताचा मी वधस्तंभ वाहतो आहे.याची जाणीव मी ख्रिस्ती असून कशा विसरतो?*

4) वधस्तंभ उचलणारा परंपरेचा अधीन नाही:-

ख्रिस्ताने जर परंपरेचा माद्यमातून शिक्षण देऊन वधस्तंभ वाहिला असता तर त्याने त्याचे ध्येय साध्य केले नसते.ख्रिस्ताने नेहमी देवाचा अधीन राहून हे कार्य केले.आज ख्रिस्ती व्यक्ती आणि मंडळी परंपरेचा माद्यमातून जीवन जगते आहे जे व्यर्थ आहे,देवाचे वचन आणि पवित्र आत्माच्या माध्यमातूनच कोणत्याही ख्रिस्ती व्यक्तीला वधस्तंभ उचलता येतो अन्यथा तो निष्पळ जाईल.

देवाच्या प्रितीची तीव्रता वधस्तंभावर दिसते, तिला समजण्यासाठी, तंतोतंत जुळणारी एकमेव गोष्ट म्हणजे देवाचा क्रोध.ख्रिस्ती विश्वासामध्ये नेहमीच देवाच्या प्रीतिविषयी बोलले जाते परंतु क्वचितच कोणी देवाच्या क्रोधाद्दल बोलताना दिसतो,कारण ते ऐकायला असाह्य आहे;(देव नरकात पापाला नाही तर पाप्याला टाकणार आहे) प्रियांनो ही गोष्ट मात्र पक्की आहे की ज्याला देवाच्या क्रोधाचा गुणधर्म समजला त्यालाच देवाच्या प्रीतिची तीव्रता कळली. देवाला पाप्यावर प्रीति करण्यासाठी, त्यांच्या पापाचा द्वेष केला पाहिजे. मग त्यांच्या पापाच्या भरपाईसाठी अर्पण हाच देवाचा एकमेव मार्ग नियमशास्त्रात आढळतो. म्हणूनच वधस्तंभाचे महत्त्व आहे. कारण ख्रिस्ताने त्यावर आपले पाप घेतले, दु:ख भोगले आणि परमेश्वराच्या क्रोधाने त्याला चिरडून टाकले. ख्रिस्ताने पाप्यासाठी असणारा देवाच्या क्रोधाचा प्याला कोणत्याही दयाळूपणाशिवाय घेतला, जेणेकरून आम्ही क्रोधविरहित दयेचा प्याला पिऊ. म्हणून जेव्हा कधी वधस्तंभाविषयी बोलाल किंवा त्याविषयी ऐकाल तेव्हा लक्षात ठेवा की, तो पित्याचा क्रोधच होता की, त्याच्या निवडलेल्यावर प्रीतिबकरण्यासाठी त्याने त्याच्या एकलूत्या एका पुत्राला वधस्तंभावर वधले!"त्याचे हालहाल केले तरी ते त्याने सोसले, आपले तोंडसुद्धा उघडले नाही; वधण्यास नेत असलेल्या कोकराप्रमाणे, लोकर कातरणाऱ्यांपुढे गप्प राहणाऱ्या मेंढराप्रमाणे, तो गप्प राहिला; त्याने आपले तोंड उघडले नाही. त्याच्यावर जुलूम करून व खटला चालवून

त्याला घेऊन गेले; जिवंतांच्या भूमीतून त्याला काढून टाकले, आणि माझ्या लोकांच्या पातकांमुळे त्याला ताडन करण्यात आले; असा त्या पिढीच्या लोकांपैकी कोणीतरी विचार केला काय? त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते. त्याला ठेचावे असे परमेश्वराच्या मर्जीस आले. त्याने त्याला पिडले; त्याच्या जिवाचे दोषार्पण झाल्यावर तो संतती पाहील, तो दीर्घायू होईल, त्याच्या हातून परमेश्वराचा मनोरथ सफल होईल."(यशया ५३:७-१०)

बी.बी.वोरफिल्ड म्हणतात ''ख्रिस्ताशिवाय असलेल्या वधस्तंभाकडून मला आश्रय नाही.वधस्तंभाशिवाय असलेला ख्रिस्त माझा तारणारा होऊ शकत नाही.पण हे वधस्तंभावर खिळलेल्या ख्रिस्ता;तुझ्याठायी मी विसावा घेतो.

## ८) फक्त ख्रिस्तच आंनदाची बातमी आहे कोणीही नाही:-

*'' आम्हाला दररोज सुवार्ता ऐकण्याची गरज आहे,कारण आम्ही दररोज ते विसरतो.'' मार्टिन लूथर*

जो विजय मिळवितो त्याला देवाच्या बागेत जे जीवनाचे झाड आहे त्यावरचे फळ मी खावयास देईन.विश्वासणारे कायमचे,सर्वकाळ,देवाच्या बागेत राहणार, या सार्वकालिक अस्तित्वाचा विचार करतांना एदेन बागेचे स्मरण व्हावे.येथे नाही मरण,नाही पाप,येथे दुःख नाही,व्यथा नाही,क्लेश नाही. सदासर्वकाळ देवाचे आशीर्वादच लाभणार.

## ९) नवीन जीवनात ख्रिस्ताचा वधस्तंभ घेऊन चालतांना:-

*"ख्रिस्ती जीवनात केवळ चांगली सुरुवात करणे पुरेसे नाही;तर स्वतःची सतत परीक्षा त्याने केली पाहिजे.
नाही तर,त्याला दिलेले तारण निष्फळ ठरेल."*

एर्डमन म्हणतो "आपण थोडे थांबून देवाचा पुत्र त्याचा चेहरा व रुबाब पाहू या,तो कसा न अडखडता वधस्तंभाकडे चालला आहे,आपल्याला एक नवा नेता दिसतो,एक नवी प्रीती दिसते,किती स्वेछेने तो आपल्यासाठी *मरण भोगतो,तरीपण त्या मरणातील अर्थ आणि रहस्य आमच्या ध्यानात येत नाही

1)देवाचा पुत्राचा चेहरा:-

_नवीन जीवनात देवाचे कार्य करत असतांना मला,फक्त ख्रिस्ताचा चेहेऱ्याकडे पाहत हे कार्य करायचे आहे,जो पर्यन्त पेत्र येशूला पाहत होता तो डूबला नाही,जो ख्रिस्ताकडे पाहतो तो लज्जित होतं नाही.

2)न अडखडता वधस्तंभाचा वाटेवर :_

ख्रिस्ती जीवनात अनेक संकल्प आपण करतो पण ते पूर्ण होत नाही.मागील आपले संकल्प पूर्ण झाळे नसेल तर खरा ख्रिस्ती व्यक्ती पश्चताप करून नवीन संकल्पनाबरोबर आपले जुने संकल्प देखील न अडखडता पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार,आणि आपला वधस्तम्भ वाटेवर घेऊन जाताना कितीही अडथडा आला तरी तो धजणार नाही.

3)एक नवीन नेता:-

वधस्तंभाचा वाटेवर चालतांना ख्रिस्त व्यक्ती नेहेमी एक नवीन नेता असतो,येशू राजा होता पण आम्हासाठी भिकारी आणि दरिद्री झाला,येशू अमर होता पण आम्हासाठी मृत्युला सामोरे गेला.येशु देव होता पण आम्हासाठी मनुष्य झाला, *एक गोष्ट लक्षात ठेवा नवीन नेता तोच आहे,जो खऱ्या अर्थाने ख्रिस्तासोबत भिकारी आणि दरिद्री आहे,जो ख्रिस्तामध्ये दुःख सहन करितो,जो ख्रिस्तामध्ये मनुष्य आहे देव नाही.

4)एक नवी प्रीती:-

एक नवीन प्रीती नेहमी वधस्तंभाचा वाटेवर आपली वाट पाहत असते.पण खूप ख्रिस्ती व्यक्ती ही प्रीती आपल्या स्वार्थासाठी दुर्लक्ष करीतात, *नवीन वर्षाचा संकल्प खूप ख्रिस्ती लोकांचा घेण्याचा असतो देण्याचा नाही,आपला कोणता आहे?

तरीही भरपूर ख्रिस्ती लोकांना वधस्तंभाचे हे रहस्य कळलेले नाही.वधस्तम्भाचा अर्थ ते आप-आपल्या सोयीने लावून घेतात.ख्रिस्ती जीवनात ख्रिस्ताचा हा वधस्तम्भ घेऊन चालतांना प्रभू आपणास वचनांचे ज्ञान,पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आणि कृपा पुरवो. आमेन.

## १०) आता आमची पाळी आहे:-

"पण आपण पापी असताना ख्रिस्त आपल्यासाठी मेला, ह्यात देव त्याची आपल्यावरील प्रीती प्रस्थापित करतो" (रोम:5-8)"देवाने आपल्या प्रितीचे प्रमाण अगोदरच सिद्ध केले आहे.आता आमची पाळी आहे"(कर्ट हंट जुगनसमेयर)

अनेकजण समजतात तसे आता देवाची परीक्षा होणार नाही पण आता तो आमची कसोटी घेऊन मूल्यमापन करणार आहे,देव आम्हावर प्रीती करितो हा प्रश्न उरलेला नाही.अगोदरच आम्हांजवळ जो पुरावा आहे त्यांच्या तुलनेने जो आणखी काही पुरावा आम्हाला पाहिजे तो विश्वास बसणार नाही इतका क्षुल्लक असणार नाही.जर वधस्तंभ देवाच्या प्रीतीची खात्री पटवू शकत नाही तर दुसऱ्या कोणत्याही गोष्टीने ते होऊ शकणार नाही.

## ११) देवाची लेकरे देवाने दिलेल्या दर्शनाने चालतात:-

*बिल हायबेल्स* म्हणतात ''दृष्टांत हा पुढारीपणाच्या अगदी केंद्रस्थानी असतो.पुढाऱ्यापासून दृष्टांत वेगळा करणे म्हणजे त्याचे किंवा तिचे हृदय तोडण्या सारखे आहे.जर पुढाऱ्यानांच आपण कोठे जात आहोत हे समजत नसेल तर ते पुढारी नाहीत.मग इतरांचे काय?"ख्रिस्ताचा ज्या *लेकरांना* आपण कोण आहोत?आणि आपला *विश्वास काय आहे?* *आपणाजवळ* काय आहे?आणि आपल्या *पित्याची आपणाविषयी काय इच्छा* आहे?हे *समजून* घेत नाहीत,ते आपले जीवन *व्यर्थ* घालवीत आहे." ख्रिस्ताने सर्वांना एकच महान आदेश दिलेला आहे ( *मत्तय 28:19;20* ) पण प्रत्येक मेंढपाळास हा आदेश पूर्ण करण्यासाठी ज्याच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणे एक *नवीन दृष्टांत* दिलेला आहे, *काय तुम्हच्याकडे तो दृष्टांत आहे* सर्व दृष्टांताचा उगम स्वतः देव आहे आणि पिता-पुत्र-पवित्र आत्मा,पवित्र शास्त्राचा माध्यमातून तो त्याच प्रिय मेंढपाळास प्रकट करत असतो. *म्हणून देवाचा राज्यात त्यांची लेकरे त्यांचा जीवनात देवाचे प्रकटीकरण प्रकट करणारी असली पाहिजे* _*कर्ट जुगसंमेयर*_ म्हणतात *"लहानशा योजना करू नका.कारण त्यामध्यें लोकांचे आत्मे चेतविण्याचे सामर्थ्य नसते"

## १२) आज्ञापालचा विपर्यास कसा केला जातो:-

*"आपल्या लहरीप्रमाणे सेवाकार्य करू नये;काही ख्रिस्ती लोक वधस्तंभावर न चढता प्रसिद्धी व्हावी म्हणून सेवा करतात."*

*जॉफ्री ओहोरा* म्हणतात "तुम्ही मला मार्ग म्हणता पण त्यावर चालत नाही,माझ्यात जीवन आहे असे तुम्ही मला म्हणता,परंतु माझ्यामध्ये राहत नाही,तुम्ही मला स्वामी म्हणता पण माझे ऐकत नाही,मी तुम्हाला दोष दिला तर मला नावे ठेवू नका ,तुम्ही मला भाकरी म्हणता पण मला खात नाही,तुम्ही मला सत्य म्हणता मजवर विश्वास ठेवत नाही,तुम्ही मला प्रभू म्हणता पण माझी सेवा करीत नाही,मी तुम्हाला दोष दिला तर मला नाव ठेवू नका.

आज्ञापालनाचा कसा विपर्यास काही ख्रिस्ती लोक करतात हे वरील वचनातून शिकायला मिळते.आज काही ख्रिस्ती मंडळीत ख्रिस्ताला मार्ग म्हटले जाते पण चालण्यासाठी जगाचे सर्व मार्ग त्यांच्यासाठी खुले करतात,ख्रिस्ताला भाकर म्हणतात पण जगिक भाकर खाण्यात त्यांना लाज वाटत नाही ,त्यांचे आत्मिक जीवन फक्त मंडळीपुरतेचं असते,असे लोक मंडळींचा बाहेर ख्रिस्तात राहत नसतात, वचनातून सत्य आणि विश्वास प्रकट करण्यात हे लोक निष्फळ ठरतात कारण ते तोंडाने ख्रिस्ताला प्रभू म्हणतात पण त्यांची सेवा स्वार्थासाठी करतात.

## १३) विभक्त आणि अविभक्त अंतःकरण:-

दाविद देवासमोर त्यांचे अंतःकरण ओतून टाकत होता,त्याच्या अदभुत कृत्याची व सद्गुणांची प्रशंसा करीत होता, परंतु त्याच्या उपासनेला दोन गोष्टी अडखळन अशा होत्या,एक त्याच्या ठायी सत्य नव्हते व दुसरे अविभक्त असे अंतःकरण नव्हते...म्हणून दाविद स्तोत्रं 86:11 मध्ये लिहितो "हे परमेश्वरा तुझा मार्ग मला दाखिव मी तुझ्या सत्यमार्गाने चालेन,तुझ्या नामाचे भय धरण्यास माझे चित्त एकाग्र कर. *जॉन मैकआरथर* च्या भाषेत"सर्वप्रथम दावीदामध्ये संशोधनाच्या रोमहर्षकतेचा अभाव होता,काही वेळा सांशीधन म्हणजे पूर्वी माहिती नसलेल्या गोष्टीच्या शोध लावणे,असा मर्यादित अर्थ नसतो तर पूर्वी तुम्हाला असलेल्या परंतु माध्यतरीच्या काळात विसर पडलेल्या गोष्टींचे पुन्हा स्मरण होणे किंवा अशा गोष्टी ज्या पूर्वीपासून ठाऊक आहेत,स्मरणातही आहेत परंतु इतक्या स्पष्टपणे पूर्वी पाहिल्या नव्हत्या,यालाही एक व्यापक अर्थाने संशोधन म्हणता येते,म्हणून दाविदाने त्याच्या संशोधन कार्यात प्रभूंचे साह्य मागितले आहे.

देवाच्या संबंध ख्रिस्ती व्यक्तीशी असतो तो हृदयाशी,कारण धन्य ते ज्यांचे अंतःकरण शुद्ध आहे कारण ते देवाला पाहतील,ज्याची मनोवृत्ती शुद्ध आहे अशा लोकांना देवाचे नेत्र पृथ्वीवर पाहत असतात,दाविद राजाची भक्ती देवाने अमान्य केली कारण होते त्याचे विभक्त अंतःकरण (बेतसेबाचे प्रकरण 51,33,स्तोत) आज ख्रिस्ती समाजातील भरपूर पुढारी आणि विश्वाशी देवासमोर खुलेपणाने भक्ती करत नाही याचे मोठे कारण त्यांचे विभक्त अंतःकरण.आज आम्हाला विभक्त अंतकरणापासून अभक्त अंतकरणाप्रयन्त जाणे अगत्याचे आहे. *आणि मी,मी म्हणून जगत नाही तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो,त्याचे पवित्र वचन माझ्याठायी जगते.*

## १४) एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून जालेल्या जखमा:-

*ओस्वल्ड सँडर्स* म्हणतात ''खऱ्या आत्मिक पुढाऱ्याचे व शिष्यत्वाचे दर्शक म्हणजे त्याला झालेल्या जखमा"सेवा करतांना झालेल्या जखमा एका ख्रिस्ती व्यक्तीच्या कार्याची साक्ष देतात.काळाचा अंतिम दिवसात या जखमा वाढतील.खरे ख्रिस्ती लोक देवाचा हेतूसाठी/दर्शनासाठी छळले जातील आणि खोटे ख्रिस्ती लोक शारीरिक गोष्टीच्या लालसेपोटी छळले जातील. *ब्रूस बर्टन* यांनी त्यांच्या मोटर दुरुस्तीच्या ठिकाणी एक पाटी लावली "आमच्या स्पर्धेसाठी म्हणून आम्ही तुम्हचा मोटारीखाली अनेकवेळा जाऊ,आमचे कपडे अधिक मळीन होऊ देऊ"ख्रिस्ती मनुष्याने अशा भावनेने सेवा करावयाची आहे,आपले मोल द्यायचे आहे,ख्रिस्ताने दिलेले वधस्तंभावरील मोल देवाने आम्हाला दिलेल्या दर्शनाच्या कृत्यातून पूर्ण होते,हे कृत्ये अनेक जखमा घेऊन येते आणि ख्रिस्ताची साक्षी देते.

*सॅम्युएल ब्रिगेलनी* म्हणतात _"आत्मिक सामर्थ्य हे आत्मिक जीवनाहून वाहात असते,सर्व सजीव,अगदी भिंतीवर वाढणारे शेवाळ ते देवाच्या राजासनासमोर असणारे आद्य देवदूत,यांना ते सामर्थ्य देवापासून प्राप्त होत असते.म्हणून ज्यांना पुढारीपणा करावयाची इच्छा असेल त्यांना मोल द्यावे लागते,ते देवच त्यांना देत असतो.आत्मिक ख्रिस्ती व्यक्तीचा जीवनात आत्मिक सामर्थ्य नेहेमी वाहात असते.ख्रिस्ताचा कार्यात झालेल्या जखमा सहन करण्यासाठी देवच त्याच्या लोकांना सामर्थ्य देत असतो.आणि हेच सामर्थ्य ख्रिस्ती व्यक्तीच्या जखमेतून ख्रिस्ताची महिमा करत असते.

ख्रिस्ती व्यक्ती हे जाणून असतो की त्याच्या मनात आपल्या परमेश्वरानसाठी एक गंभीर,व्यापक व अतृप्त अशी तहान आहे;आणि ही तहान विश्वासाने पूर्ण होत असते. म्हणून **फिंडले** म्हणतात "कारण ख्रिस्ती मतप्रणाली विश्वास करण्यायोग्य आहे तर आम्हास त्यावर मोठया वीरतेने विश्वास ठेवण्याची गरज आहे." म्हणून आज जेव्हा काळाचे समापन होतांना दिसते आहे, तेव्हा आपल्या विश्वासात बळ प्राप्त करण्यासाठी प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने पवित्रशास्त्र आणि प्रार्थनेचा माध्यमातून आपली तहान तृप्त करत परमेश्वरासाठी सुवेळी-अवेळी आवेशी असलेले पाहिजे.

धन्य आहे तो जो देवाची इच्छा पूर्ण करितो:- बिल बोर्डन देवाच्या इच्छेला महत्व देत म्हणतात"खरा धन्य व्यक्ती तो आहे जो "प्रभु येशू जेथे माझ्या जीवनाचा प्रश्न आहे तेथे मी तुला आपल्या हृदयाच्या सिहांसनावर बसवितो,मला तुझ्या इच्छेनुसार बदलवून टाक, शुद्ध कर,माझा उपयोग कर." खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीच्या प्रत्येक क्षेत्रात देवाची ईच्छा प्रथम असते आणि ती पूर्ण होते.कारण हा ख्रिस्ती व्यक्ती नेहमी आपल्या हृदयाच्या सिहांसनावर ख्रिस्ताला घेऊन फिरतो म्हणून देव त्याच्या उपयोग आपल्या महिमेसाठी आनंदाने करतो

## संदर्भग्रंथसूची:-


**१) ख्रिस्ती श्रद्धा व आचरण,जॉन मेक्कवेड,जी एल एस प्रकाशन,प्रथमावृत्ती २०१५,मुंबई**

**२) The Heart of Man,All Nations Gospel Publishers,ISBN_0-908412-29**

**३) आत्मविश्वास कि कुंजी,स्वेड मॉर्गन,जी एस जी प्रकाशन,प्रथमावृत्ती,दिल्ली**

**४) Bakht Singh of India,T.E.Koshy,Authentic,First Edition,Hedrabad**

**५) बायबल सर्वेक्षण,डॉ जोएल,डॉ मायकल,डॉ गैराल्ड,एलेथिया प्रकाशन,प्रथमावृत्ती,२०१८ नाशिक**

**६) अश्रू पुसणारे वचन,जी पी प्रकाशन,X000X7L31D,खाजगी प्रकाशक**

**७) पवित्र यात्रा भूमी,रेव्ह आशाकांत रामटेके,खाजगी प्रकाशक**

८) प्रमे रखो या मारो,आलेक्जाडर स्ट्रोच,एलेथिया प्रकाशन,२०१८,प्रथमावृत्ती,नासिक
९) पवित्र बायबल,दुसरे पेत्रकरास,adhya १-वचन-२०-२१
१०)पवित्र बायबल,योहानकृतशुभवर्तमान,अध्याय ४-वचन-४८